
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय तेरावा , भाग दुसरा

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

# भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

## अध्याय तेरावा : भाग दुसरा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)


२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

## श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com



ई प्रकाशन :

## ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

**E** Sahity Pratishthan

**E**leventh floor(G1102)

**E**ternity

**E**astern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख



©श्री विजय पांढरे(२०१२)



**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**



प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भेट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

अर्जुना हे मन । सर्व घडामोडींचं कारण । येथे सर्व काही घडणं । मनाकारणे ॥३०२॥
अंतरातील संस्कार । ते प्रकटती जैसे बाहेर । तैसेच इंद्रियांचे व्यापार । होती अर्जुना ॥३०३॥
अंतरात जे असते । तैसेच कर्म बा घडते । जेव्हा फल पक्व ते होते । पसरतो सुगंध ॥३०४॥
ऐसे अहिंसे कारण । इंद्रियांचे अहिंसक होणं । तेच प्रेमभावाचं प्रकटन । अर्जुना माझ्या ॥३०५॥
समुद्रासी येता भरती । सर्व खाड्या भरून जाती । तैसेच कर्म बा घडती । इंद्रियाठायी ॥३०६॥
हे बहुत झाले वर्णन । जसं बालकाचा हात धरून । पंतोजीनेच ते लिहणं । अक्षर जैसे ॥३०७॥
तैसे ते दयाळूपण । जे असते मनाकारण । तयाचाच ते प्रकटन । अहिंसा अर्जुना ॥३०८॥
जे असते मनात । तैसेच इंद्रिय करतात । ऐसी कर्मे बा घडतात । मनाचे कारणे ॥३०९॥
जयाच्या मन वाचा देहात । प्रेम असे दिसत । तो ज्ञान साक्षात । समज अर्जुना ॥३१०॥
तयाचं ते मन । आणि तयाचं वर्तन । तेच बा लक्षण । ज्ञानाचं अर्जुना ॥३११॥
कानाने जी ऐकली । ग्रंथात जी वाचली । ती अहिंसा पहायची झाली । तर पहावे याला ॥३१२॥
जे सांगावं एका शब्दानं । ते गेलं पहा विस्तारून । मला मोठ्या मनानं । करावी क्षमा ॥३१३॥
जसा हिरवा चारा पाहून । जनावरा न उरे भान । वा जसा वादळाकारण । भरकटे पक्षी ॥३१४॥
तैसे प्रेमाचिया स्फूर्ती । वाहवली माझी मती । म्हणून बोलणे हे अति । झाले अर्जुना ॥३१५॥
अहिंसा शब्दात अक्षर तीन । म्हणून सांगितलं विस्तारानं । अर्जुना प्रेमाच्या कारण । घडलं सारं ॥३१६॥
अहिंसेचा प्रश्न येता । आहे तेथे मतभिन्नता । म्हणून चर्चा ती तत्त्वत: । गरजेची अर्जुना ॥३१७॥
एऱ्हवी त्या मतांना डावलून । जर बोललो तोंडभरून । वायाच की ते बोलणं । न समजता ॥३१८॥
रत्न पारख्यांच्या गावी । कसोटी न पडे दाखवावी । सरस्वतीस जी समजवावी । ऐसी अक्षरे कोठे ॥३१९॥
जयांचे नाक अति तीक्ष्ण । तयाना कापूर म्हणून । पिठाचा विक्रा करणं । अशक्य अर्जुना ॥३२०॥
ऐशा विद्वानांच्या सभेत । बोलकेपणा नाही चालत । सर्वकाही जाणतात । इथे सारे ॥३२१॥
अहिंसेस संपूर्ण उकलून । जर मी तुम्हा न दाविन । मग माझे ते बोलणं । न आवडेल तुम्हा ॥३२२॥
स्पष्ट जर न मी बोलेल । मनी शंका त्या उठतील । मग ऐकणेच न घडेल । अवधान जाता ॥३२३॥
पहा ज्या सरोवरात । पाणी शेवाळलेला असत । तेथे नाहीच हंस जात । कधी अर्जुना ॥३२४॥
अभ्रांची सरता वस्ती । चांदणे दिसू लागती । पण चकोर का कधी भुलती । चांदण्यांना अर्जुना ॥३२५॥
जर स्पष्ट न मी बोलेल । तुम्हास ते न आवडेल । आणि कंटाळा तो येईल । निरुपणाचा ॥३२६॥
सर्व मते समजावून घेता । आणि योग्य ते निवडता । प्रकटते मग विवेकता । तेथे अर्जुना ॥३२७॥
अर्जुना माझं हे बोलणं । त्यासाठीच ग्रंथ लिहिणं । व्हावे सर्वांचेच कल्याण । वाटे मजसी ॥३२८॥
गीता तुमचा प्राण । गीतेत गुह्य ज्ञान । म्हणून गीतेवर निरूपण । केले पहा ॥३२९॥
जे जीवभाव संपू देतील । तयानाच गीता समजेल । जिज्ञासेच्या बीजासी ही ओल । लागो अर्जुना ॥३३०॥
जीवभावाचा लोभ धराल । आणि ओलीस या अव्हेराल । मग आत्मज्ञान राहील । दूर अर्जुना ॥३३१॥
सर्व जिवांचे व्हावे कल्याण । ऐसेच मजसी वाटणं । म्हणून हे निरूपण । करतसे मी ॥३३२॥
तुमच्या मनातील गोंधळांना । जाणले मी पहाना । म्हणून विविध या मताना । खोडावे लागले ॥३३३॥
या कारणे विस्तार झाला । श्लोकार्थ दूर गेला । करावी क्षमा मजला । मी बालमती ॥३३४॥
जेधवा घासात खडा येतो । तो काढण्या वेळ लागतो । वेळ का व्यर्थ तो । गेला अर्जुना ॥३३५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

लुटारूंना ते चुकवणे । म्हणून येण्या वेळ लागणे । मग मातेने लिंबलोण उतरवणे । गरजेचे अर्जुना ॥३३६॥
तुम्ही माझे ऐकले । सर्व बा सहन केले । आता भगवंते जे सांगितले । ऐकावे तुम्ही ॥३३७॥
म्हणे कुंतीनंदना । सावध होई अर्जुना । करू तुज ज्ञाना । ओळखी आता ॥३३८॥
तयासीच ज्ञान म्हणतात । जेथे दया क्षमा असे वसत । आणि शांती जेथे अविरत । वास करी ॥३३९॥
जसे खोल सरोवरात । कमळ वेली वाढतात । वा भाग्यवंता घरी असे रहात । संपत्ती जैसी ॥३४०॥
जयाच्या त्या कारणे । घडे क्षमावृत्तीचे वाढणे । ती सर्व लक्षणे । सांगतो तुजला ॥३४१॥
आपले आवडते दागिने । जसे आवडीने परिधान करणे । तैसे तयाने सहन करणे । सर्वकाही ॥३४२॥
त्रितापाचे डोंगर । जरी कोसळती अंगावर । तरी राहे स्थिरता अपार । अंतरी त्याच्या ॥३४३॥
काहीही ते घडता । नच भंगते तयाची समता । विपरीतता आणि अनुकूलता । नाही तेथे ॥३४४॥
तया मान आणि अपमानात । सुखात वा दु:खात । किंवा निंदा आणि स्तुतीत । भेद नाही ॥३४५॥
न तपे तो उन्हाळ्यात । आणि नच कुडकुडे हिवाळ्यात । वृत्ती कोणत्याही प्रसंगात । स्थिर त्याची ॥३४६॥
स्वशिखरांच्या त्या भारा । मेरु न कंटाळे जरा । ओझे का वाटे वराह अवतारा । पृथ्वीचे कधी ॥३४७॥
नाना प्राण्यांच्या कारणे । जसे पृथ्वीने न कंटाळणे । तैसे सुखादु:खाच्या त्या कारणे । न कंटाळे तो ॥३४८॥
सर्व त्या नद्यांचे पाणी । मिळतसे समुद्रा येऊनि । त्या सर्वांसी घेई सामावूनि । सागर जैसे ॥३४९॥
तैसे तयाच्या ठायी । काहीच तक्रार नाही । आणि सहन करतो ऐसेही । न स्मरे त्यासी ॥३५०॥
जे काही घडते । ते आपलेच स्वरूप असते । जेव्हा ऐसी समज येते । मग दु:ख नाही ॥३५१॥
ऐसी अनंत क्षमा । जयापाशी प्रियोत्तमा । जाण तेणे महिमा । ज्ञानासी केला ॥३५२॥
तो पुरुष पांडवा । ज्ञानाचाच ओलावा । आता ऐक आर्जवा । सांगतो मी ॥३५३॥
तरी आर्जव ते ऐसे । वायूचे सौजन्य जैसे । चांगला वाईट ऐसे । भेदू नाही ॥३५४॥
जसं त्या सूर्यानं । जगताला प्रकाश देणं । आणि सर्वांसाठी ते गगन । एक अर्जुना ॥३५५॥
तैसे जयाचे मन । सर्वांसाठी समान । भेदभावाचे वर्तन । नाही तेथे ॥३५६॥
जो स्वयेचि जग जाहला । जगासी एकत्व पावला । तेथे मग भेदभावाला । स्थान नाही ॥३५७॥
सर्वांची भागते तहान । जशी एकाच त्या पाण्यानं । तसा वागे तो समत्वानं । सर्वांसी अर्जुना ॥३५८॥
जैसे बालकाचा स्वभाव । तैसे सरळ मनीचे भाव । शंका आणि हाव । नाही तेथे ॥३५९॥
जसं बालकाचं बोलणं । नाही कपटासी स्थान । तैसे तयाचे मन । शुद्ध अर्जुना ॥३६०॥
जसं उमललेल्या कमळानं । सर्वांनाच सुगंध देणं । तसं समत्वान वागणं । याचं अर्जुना ॥३६१॥
शुद्धपणाच्या त्या कारणे । रत्नाने तेजाने झळकणे । तैसे तयाच्या वागणुकीने । ओळख त्याची ॥३६२॥
आसक्ती द्वेष जो नेणे । इंद्रियासी विरक्त असणे । चांगले वाईट म्हणणे । न ठाऊक तया ॥३६३॥
मनी भाव नाही स्वार्थाचा । म्हणून मिंधा न तो कोणाचा । तयाठायी हीनबुद्धीचा । लवलेश नाही ॥३६४॥
दहाही इंद्रियांचं वागणं । मीपणाच्या भावावीणं । तयाचे ते पंचप्राण । मुक्त अर्जुना ॥३६५॥
जशी अमृताची धार । तैसे कोमल त्याचे अंतर । किंबहुना तो माहेर । प्रेमाचे अर्जुना ॥३६६॥
जो ऐशा स्वभावाचा । जिवंत पुतळा प्रेमाचा । समज तेथे ज्ञानाचा । वास आहे ॥३६७॥
अर्जुना तू आता । ऐक गुरुभक्तीची कथा । गुरुभक्तीची वार्ता । कल्याणदायी ॥३६८॥
सद्गुरुसी शरण जाता । सद्गुरूंचा संग मिळता । जीव ब्रह्माची एकता । घडे अर्जुना ॥३६९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

काय ते ध्यान अवधान । जाणते जेव्हा ते मन । तेव्हा प्रकटते ते ज्ञान । अंतरी अर्जुना ॥३७०॥
जैसे त्या गंगेनं । सागरचि होऊन जाणं । तैसे जाणून ते अवधान । हो ब्रह्म अर्जुना ॥३७१॥
सर्व ते गुणागुण । आणि आपुले जीवपण । टाकी पतीवरून ओवाळून । पतिव्रता जैसी ॥३७२॥
तैसे आंतरबाह्य आपुले । जेणे सद्गुरुसी अर्पिले । तयानेच पहा जाणले । भक्तीसी अर्जुना ॥३७३॥
ब्रह्ममयता जाणून । ब्रह्मच जात असे तो होऊन । ऐसे स्वत: ब्रह्मस्वरूप होणं । ज्ञान अर्जुना ॥३७४॥
प्राप्त होण्या ते ज्ञान । तयाने संपूर्ण शरण जाणं । मनइंद्रियासी ओलांडणं । सूत्र आहे ॥३७५॥
त्या ज्ञानाच्या कारण । त्याने जीवपण विसरणं । मग स्वप्न सुषुप्तीस ओलांडून । ज्ञान होई ॥३७६॥
मनी असावी ब्रह्माचीच आस । आणि ब्रह्ममयतेचा ध्यास । मग ओलांडणे मनइंद्रियास । शक्य अर्जुना ॥३७७॥
सदैव सजग राहून । करावे चिंतन आणि मनन । निर्गुण निराकाराची आस असणं । कल्याण अर्जुना ॥३७८॥
म्हणे हे इंद्रिय केव्हा सुटतील । मी ब्रह्म कधी होईल । आणि कधी बा खुंटेल । भवचक्र माझे ॥३७९॥
सद्गुरूचे बोल ऐकून । शांत होई त्याचे मन । भोगांची इच्छा धरणं । न ठाऊक तया ॥३८०॥
केवळ उपदेश तो ऐकून । होतसे तया ज्ञान । जैसे बीजाचं ते अंकुरणं । वर्षाकाली ॥३८१॥
सद्गुरुचे नाव आठवत । ध्यानात असे तो डुंबत । आकाशच होऊन असे जात । अंतरी अर्जुना ॥३८२॥
ब्रह्ममयतेची ऐसी । आवडी जया मानसी । जाण ज्ञान तयापाशी । चाकरी करी ॥३८३॥
आणि अंत:करणात । ब्रह्ममयतेचे पोवाडे गात । ध्यान असे तो करत । अंतरी अर्जुना ॥३८४॥
प्रकटण्या ते ज्ञान । निश्चल करतसे मन । जातसे सर्वकाही होऊन । ध्यान करता ॥३८५॥
ज्ञानाच्या आवारात । आणि आनंदाच्या देवळात । तो ध्यान असे करत । ब्रह्ममयतेचे ॥३८६॥
सर्व इच्छा सोडत । मन एकाग्र करत । पावे तो ध्यानामृत । समाधी लागता ॥३८७॥
मन शुद्धी त्रिकाळी । जीवदशेचा धूप जाळी । आणि ज्ञानदिपे ओवाळी । निरंतर ॥३८८॥
ऐक्याचा नैवेद्य अर्पून । जीवभाव तो सांडून । जात असे तो होऊन । ब्रह्म स्वत: ॥३८९॥
ऐसे जीवभाव टाकणे । मनइंद्रिया सोडणे । अंतरी ब्रह्ममय होणे । भक्ती अर्जुना ॥३९०॥
ब्रह्ममयतेच्या आवडीने । सद्गुरुसी शरण जाणे । सद्गुरुची सेवा करणे । आवडे तया ॥३९१॥
करून ते ध्यान । शुद्ध करी तो मन । इंद्रियासी तादात्म्य तोडून । ब्रह्म होई ॥३९२॥
मनइंद्रिय ओलांडता । ब्रह्मचि होय तो स्वत: । अनुभवून ब्रह्ममयता । धन्य होई ॥३९३॥
ऐसे ब्रह्ममयतेच्या आवडीने । सद्गुरुसी शरण जाणे । अंतरी ब्रह्म अनुभवणे । ध्यान सुख ॥३९४॥
निरंतर ब्रह्मसुख अनुभवून । स्वत:च सद्गुरू होणं । भवचक्रा ते तोडणं । कल्याण अर्जुना ॥३९५॥
ध्यान करून । स्वत:चं चैतन्य होणं । जीवभाव सांडणं । भक्ती अर्जुना ॥३९६॥
ऐसे गुरुकृपे कारण । स्वत:च ब्रह्म होणं । तेच बा ध्यान । आहे अर्जुना ॥३९७॥
अंतरी प्रकटता ज्ञान । तयाने परिपूर्ण होणं । मग शिकवतसे तो ध्यान । इतरांनाही ॥३९८॥
ऐसे स्वत: जागून । इतरांनाही जागवणं । तीच बा सेवा करणं । ईश्वराची ॥३९९॥
करुणा क्षमा शांती । तयाच्या अंतरी असे ती । म्हणून ज्ञानाची ती वस्ती । अंतरी त्याच्या ॥४००॥
ऐसे प्रेमाचे प्रकटन । तेच आहे बा ध्यान । स्वत:चं विश्व होणं । कल्याणकारी ॥४०१॥
ऐसी ब्रह्ममयता अनुभवत । जगी असे तो राहात । तयाच्या त्या मनात । करुणा मोठी ॥४०२॥
तयाने जीवभाव संपवून । सर्व जगतासी एकरूप होणं । त्या नाव ज्ञान । अर्जुना माझ्या ॥४०३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मनाचा अंत होता । इंद्रियां पहा ओलांडता । जाणून त्या आत्मतत्त्वा । तो धन्य होई ॥४०४॥
आत्मतत्त्वी जो पावला । मग तो विश्वचि झाला । ऐसा जीवदशेतून सुटला । कायमचा तो ॥४०५॥
म्हणेन तुमचा देवा । परिवार जो आघवा । तो मीच होआवा । करा ऐसे ॥४०६॥
जी काही उपकरणे आपुली । छोटी मोठी धाकुली । मीच रुपे तेतुली । होआवी स्वामी ॥४०७॥
ऐसा मागेन वर । तेथ हो म्हणतील श्रीगुरूवर । मग संपूर्ण त्यांचा परिवार । मीच होईन ॥४०८॥
उपकरण जात सकळीक । ते मीचि होईन एकेक । घडो ऐसे गुरुसेवेचे कौतुक । अंतरी माझ्या ॥४०९॥
ऐसी घडता गुरूसेवा । गुरू माझ्या एकट्याचाच व्हावा । मग वाटेल पहा हेवा । जगा साऱ्या ॥४१०॥
तया ऐसे प्रेम करील । ते फक्त माझेच होतील । माझ्या इच्छेनुसारच करतील । सर्वकाही ॥४११॥
जसं त्या वाऱ्यानं । चार दिशेतच रहाणं । तैसे गुरुकृपेस कोंडीन । अंतरी माझ्या ॥४१२॥
धारण करीन सद्‌गुणांसी । न सोडेन कधी गुरू चरणासी । ऐसी येईल फळासी । भक्ती माझी ॥४१३॥
गुरूस्नेहाची वृष्टी होता । मीच होईन पृथ्वी तत्त्वत: । प्राप्त ऐशा अनंत मनोरथा । मन त्याचे ॥४१४॥
म्हणे श्री गुरूचे भवन । मीच स्वत: होईन । आणि सेवा पहा करीन । अखंड तेथे ॥४१५॥
गुरुदेव येतील जातील । घराचा उंबरठा ओलांडतील । त्या दारासकट मी होईल । द्वारपाल ॥४१६॥
पादुका मी होऊन । तयांचे चरण सेवीन । आणि मीच बा करीन । बाऱ्या सगळ्या ॥४१७॥
चवर ती हाती धरून । मीच वाट दाखवीन । आणि स्वामी पुढे होईन । दिवटा मी ॥४१८॥
झारी हाती धरून । मीच चूळ करवीन । तस्त मीच होईन । चुळीसाठी ॥४१९॥
विडा मीच देईन । थुंकी मीच झेलेन । मीच पाणी देईन । स्नानासाठी ॥४२०॥
होईन गुरुंचे आसन । अलंकारही मीच होईन । चंदनादि बनून । उपचार ते ॥४२१॥
वस्त्र अलंकार होऊन । पूजा मी करीन । स्वयंपाकी मी बनून । वाढेन त्यांना ॥४२२॥
जेव्हा करतील ते भोजन । मीच पंक्तीला बसेन । आणि मीच मग होईन । विडा त्यांचा ॥४२३॥
ताट मी काढीन । अंथरूण मी घालीन । आणि पाय त्याचे चेपीन । मीच तेथे ॥४२४॥
सिंहासन मी होईल । ज्यावरी गुरू बसतील । अशी अखंड मी करील । सेवा त्यांची ॥४२५॥
श्रीगुरूंचे मन । जया देईल अवधान । ते मीच होईन । क्षणार्धात ॥४२६॥
तेथे श्रवणाच्या अंगणी । मीच शब्द होईन प्रतिक्षणी । अर्थ तो होऊनि । प्रकटेन मीच ॥४२७॥
श्रीगुरूंचे डोळे । पाहतील जे जे सोहळे । ते बा सगळे । होईन मीच ॥४२८॥
गुरूंना जे जे रुचेल । ते सर्व मी होईल । सुगंध ही होऊन जाईल । सेवेसाठी ॥४२९॥
रहावे गुरुसेवेत । होऊन समस्त वस्तुजात । ऐसेच तयाचे मनोगत । सदासर्वदा ॥४३०॥
जोवरी देहाचे असणे । तोवरी ऐसीच सेवा करणे । देहांतीही तीच वृत्ती असणे । अंतरी त्याच्या ॥४३१॥
देहांती माती होऊन । तेथेच मी राहीन । जेथे श्रीगुरूंचे चरण । वास करती ॥४३२॥
ते पाणी मी होईल । जया श्रीगुरू स्पर्श करतील । सर्व मी होऊन जाईल । तयांच्यासाठी ॥४३३॥
तेज मी होऊन । श्रीगुरूंना ओवाळीन । टाकीन उजळून भुवन । श्री गुरुंचे माझ्या ॥४३४॥
माझा तो प्राण । चवरी पंखा होईन । श्रीगुरूंची सेवा करीन । होऊन वायू ॥४३५॥
सोडेन जीवभावाचा पाश । जेथे श्रीगुरू करती निवास । ते सर्व आकाश । होईन मी ॥४३६॥
ऐसा मरो की जिवंत । सतत राहीन मी सेवेत । करीन काळ अनंत । सेवा गुरूची ॥४३७॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

इतकी सारी सेवा करून । न भरेच तयाचे मन । अखंड सेवेची इच्छा असणं । अंतरी त्याच्या ॥४३८॥
रात्र दिवस न पहाता । सतत सेवेची राबता । अंतरी सदैव प्रसन्नता । सेवेसाठी ॥४३९॥
सेवेचेनि नावे । तयाने गगनाहून थोर व्हावे । सदैव करी प्रेमभावे । सेवा ऐसी ॥४४०॥
हृदयवृत्तीच्या पुढे ते । तयाचे शरीर धाव घेते । आणि कृती स्पर्धा करते । मनाशी त्याच्या ॥४४१॥
श्रीगुरूंनी गमतीनं । एखादा शब्द उच्चारणं । आणि याने ओवाळून टाकणं । जीव आपला ॥४४२॥
ऐसा गुरुसेवेत झिजणारा । गुरुसेवेत रमणारा । गुरूआज्ञेत रहाणारा । सदैव जो ॥४४३॥
जो गुरूकुळाकारणे कुलीन । सर्वांशी सौजन्य ठेवून । गुरूसेवा करणं । व्यसन त्याचे ॥४४४॥
गुरूसंप्रदायधर्म । ते जयाचे वर्णाश्रम । गुरूसेवा नित्यकर्म । तयासाठी ॥४४५॥
गुरू तयाची देवता । गुरू माय आणि पिता । जो गुरूसेवे परौता । मार्ग नेणे ॥४४६॥
श्रीगुरूंचे द्वार । ते जयाचे सर्वस्व सार । सर्व गुरूसेवका सहोदर । मानले त्याने ॥४४७॥
तयाच्या त्या  मुखात । गुरूनाम असे वसत । गुरूवाक्य त्याच्या मनात । सदैव राही ॥४४८॥
शिवतले गुरूचरणी । भलते जे पाणी । तया तो पवित्र मानी । तीर्थाहून ॥४४९॥
श्रीगुरूंचे उष्टे । लाभे जे अवचटे । तो तेणे लाभे विटे । समाधीसी ॥४५०॥
श्रीगुरूंचे घडता चालणं । मातीकणांचं जे उडणं । तया कपाळी लावून । पवित्र होई ॥४५१॥
हे असे सांगू किती । काय वर्णू तयाची भक्ती । पवित्र तयाची मती । बोधाकारणे ॥४५२॥
जया ऐसी भक्तीची आवड । मनी गुरुसेवेचे चाड । तया सेवेवाचून गोड । न लागे काही ॥४५३॥
तो तत्त्वज्ञानाचा ठाव । तो ज्ञानाचेच गाव । तोच असे देव । ज्ञानी भक्त ॥४५४॥
ऐशा भक्ताच्याच कारणे । जगी ज्ञान पसरणे । सत्य ज्ञानाचे ते नांदणे । अंतरी त्याच्या ॥४५५॥
ब्रह्मज्ञाना खातर । माझ्या जिवी इच्छा फार । म्हणून शब्द अनावर । झाले माझे ॥४५६॥
एरवी हात असून खुळा । भजन अवधानी आंधळा । सेवेलागी मी पांगळा । असून पाय ॥४५७॥
मुका मी गुरूवर्णनात । आळशी कर्म करण्यात । परि ज्ञानाची असे इच्छा वसत । मनी माझ्या ॥४५८॥
तेणेचि पै कारणे । घडले विस्तृत हे बोलणे । अंतरीच्या ओढीकारणे । बोललो सारे ॥४५९॥
अतिरेक तो सोडावा । केवळ अर्थ तो जाणावा । सार तो ग्रहण करावा । अंतरी तुम्ही ॥४६०॥
आता बोलेल तो श्रीकृष्ण । जो सर्व सृष्टीचे कारण । आणि ऐकतसे अर्जुन । आज येथे ॥४६१॥
शुचित्वाचे वर्णन । आता मी करीन । शुद्ध अंग आणि मन । कापुराचे जैसे ॥४६२॥
जैसा रत्नाचा प्रकार । अंतर्बाह्य चमकदार । तेजस्वी सूर्य प्रखर । जैसा असे ॥४६३॥
अंतरीच्या शुद्धतेकारणे । बाहेर शुद्ध कर्म घडणे । आत बाहेर शुद्धता असणे । लक्षण अर्जुना ॥४६४॥
कर्म करताना भासे । परि अंतरी शुद्ध असे । कर्माचे बंधन तैसे । न घडेच की ॥४६५॥
जसे माती ती वापरून । आरसा स्वच्छ करणं । तैसे कर्म करून । न घडे बंध ॥४६६॥
आत आणि बाहेर । शुद्धता ती अपार । सदैव प्रज्ञा प्रखर । तेवत असे ॥४६७॥
एऱ्हवी तरी पांडुसुता । आत शुद्ध नसता । बाहेर ती कर्मठता । विटंबनाच की ॥४६८॥
मृत जैसा शृगांरिला । गाढव तीर्थी न्हाणिला । कडू भोपळा माखिला । गुळाने जैसा ॥४६९॥
ओसाड घरा तोरण बांधणे । कमरेचे सोडून डोई घेणे । वा शृंगार ते करणे । विधवेने जैसे ॥४७०॥
वरवरचा मुलामा केवळ । जळो ती चमक पोकळ । शेणाचे जसे रंगीत फळ । बिनकामाचे ॥४७१॥


For Complete Dnyaneshwari Visit :  www.esahity.com

तैसे कर्म शुद्धतेवीण । तो नुसताच बा शीण । ते मदिरेचा घडा बुचकळणं । गंगेमाजी ॥४७२॥
प्रथम अंतरी ज्ञान व्हावे । मग बाह्य बदलते स्वभावे । केवळ बाह्य कर्मे न संभवे । ज्ञान कधी ॥४७३॥
म्हणून बाहेर सत्कर्म करणे । आणि अंतरी ज्ञान असणे । हीच बा ज्ञान लक्षणे । अर्जुना माझ्या ॥४७४॥
मनीचे भेदाभेद गेले । मन ब्रह्ममय झाले । मग असे जे उरले । ते शुचित्व अर्जुना ॥४७५॥
म्हणोनी सद्भाव जीवगत । सदैव असे आचरणात । स्फटिकगृहीचे डोलत । दीप जैसे ॥४७६॥
जयाचे कारणे । घडे विकल्पाचे उपजणे । आणि आचरण ते बिघडणे । जिवाचे अर्जुना ॥४७७॥
ते ऐके देखे वा भेटे । परि मनी काहीच न उमटे । जसे आकाश न फाटे । कधी अर्जुना ॥४७८॥
एऱ्हवी इंद्रियांचेनि मेळे । विषयात भासे लोळे । परि विकारांचेनि विटाळे । लिंपेचना ॥४७९॥
चालता त्या वाटेवरी । शुद्धि वा अशुद्धि जरी । वाट न विटाळे तियापरी । आचरण त्याचे ॥४८०॥
का पतिपुत्राते आलिंगी । एकचि ती तरुणांगी । तेथ पुत्रभावाच्या अंगी । न उपजे कामू ॥४८१॥
तैसे हृदय शुद्ध असणं । संकल्प विकल्प ते संपणं । परि कर्तव्य अकर्तव्याची जाण । असे तेथे ॥४८२॥
जसा हिरा न भिजे पाण्यात । वा खडा न शिजे आधणात । तसा नाही लिप्त होत । विकाराने कधी ॥४८३॥
तया नाव शुचित्वपण । पार्था गा संपूर्ण । तेथेच बा असणं । ज्ञानाचं अर्जुना ॥४८४॥
मनी समत्व असणं । तेच ज्ञानाचं लक्षण । समत्व आणि ज्ञान । भिन्न नाही ॥४८५॥
त्या प्रारब्धाकारणे । घडे देहभोग भोगणे । परि मन समत्वाचे डळमळणे । न घडे कधी ॥४८६॥
जसं गाईचं मन । न जाई वासरा सोडून । वा पतिव्रतेचे ते आलिंगन । भोग नाही ॥४८७॥
धनापासून दूर जाता । धनचि असे लोभ्याचे चित्ता । तैसे देह भोग भोगता । न चळे चित्त ॥४८८॥
धावणाऱ्या अभ्रासवे । जसे आकाश न धावे । नक्षत्रां सोबत न घुमावे । ध्रुवाने जैसे ॥४८९॥
वाटसरू सोबत । वाट नाही जात येत । वा वृक्ष नाही ती सोडत । जागा जैसी ॥४९०॥
तैसे तयाठायी चलनवलन । या पंचभुताकारण । तरी मती स्थिर असणं । तयाची अर्जुना ॥४९१॥
वावटळीचे बळे । पृथ्वी जैसी न ढळे । तैसे विकारांमुळे । तो चळेच ना ॥४९२॥
दारिद्र्य दु:खाने न तपे । भय शोकाने न कंपे । मृत्युकारणे न विलापे । देहाच्या कधी ॥४९३॥
भय आशा कारण । अथवा होता व्याधी प्रकटन । कधीच होत नाही खिन्न । चित्त त्याचे ॥४९४॥
होता निंदा अपमान दंडन । वा कामक्रोधाचं प्रकटन । तरी स्थिरता कधी न भंगणं । मनाची त्याच्या ॥४९५॥
आकाश विरून जावो । वा धरणीकंप होवो । तरी मन समत्वाचा ठावो । न चळे कधी ॥४९६॥
फुलांनी मारता हत्तीला । तो का कधी बुजला । तैसा हा न विचलित झाला । निंदेने कधी ॥४९७॥
लाटा उठता क्षीरसागरात । पर्वत मंदार नाही थरथरत । जशी आग नसे लागत । आकाशा कधी ॥४९८॥
तैशा ऊर्मी त्या येता । नच ढळे याची समता । कितीही आघात झेलता । विचलित नाही ॥४९९॥
स्थैर्य जया म्हणतात । तो गुण असे येथे वसत । सदैव तो समतेत । राही अर्जुना ॥५००॥
ऐसे स्थैर्याचे लक्षण । सदैव जयाच्या अंगी असणं । तेच बा ज्ञान । आहे अर्जुना ॥५०१॥
समंध जैसा घराला । आणि वीर जसा शस्त्राला । वा लोभी तो धनाला । न विसरे जैसा ॥५०२॥
एकुलत्या एक मुलावर । जसे मातेचे प्रेम अपार । वा मधाचा न पडे विसर । मधमाशीस जैसा ॥५०३॥
ऐसे आपले मन जपतो । इंद्रियात न तो फसतो । सतत जागरूक असतो । प्रतिक्षणी अर्जुना ॥५०४॥
म्हणे काम प्रबळ होईल । आणि आशा ती जागेल । मग जीव माझा जाईल । म्हणून बिहे ॥५०५॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

असता बायको भांडखोर । दांडगा पती घाली आवर । तसा तो इंद्रियांवर । अंकुश ठेवी ॥५०६॥
सतत सजग राहून । देहासी कष्ट देणं । इंद्रिया संयमित ठेवणं । आवडे तया ॥५०७॥
मनाच्या महाद्वारी । प्रत्याहाराचा मंत्र धरी । यम दम हे पहारेकरी । जागती सदैव ॥५०८॥
अधरी नाभी कंठी । उभारून बंधत्रयाची घरटी । संकल्प विकल्पाची उठाउठी । संपवी तो ॥५०९॥
संकल्प विकल्प ते संपता । चित्त लया जाता । समाधि ती लागता । ज्ञान होई ॥५१०॥
ऐसा अंत:करण निग्रह होता । प्रकटते ज्ञानाची सत्ता । ब्रह्ममयतेची ती वार्ता । प्रकटे तेथे ॥५११॥
ऐसे जयाचे अंत:करण । सदैव असे स्वाधीन । तो मूर्तिमंत ज्ञान । जाण अर्जुना ॥५१२॥
विषयांच्या त्या संबंधात । मनी वैराग्य असे वसत । जसे प्रेता नाही देत । मिठी कोणी ॥५१३॥
जसे ओकलेले अन्न । कोणीच नाही करत ग्रहण । आणि जळत्या घरात शिरणं । न आवडे कोणा ॥५१४॥
विष ते खाणं । वाघा पुढ्यात जाणं । महापुरी उडी घेणं । चूक जैसे ॥५१५॥
तप्त लोहाच्या रसात । कोणी उडी नसे घालत । आणि उशासी नसे घेत । अजगरा कोणी ॥५१६॥
अर्जुना तेणे पाडे । जयासी विषयवार्ता नावडे । इंद्रियाचेनि भिडे । तो हालेच ना ॥५१७॥
आळशी तो विषय भोगात । देह असे किडकिडीत । यम-दम असती आवडत । अति त्याला ॥५१८॥
व्रत तप साधना । आवडे तयाच्या मना । गर्दीच्या त्या ठिकाणा । टाळतसे तो ॥५१९॥
बहु योगाभ्यासी हाव । एकांताकडे धाव । न साहे तया नाव । गर्दीचे अर्जुना ॥५२०॥
भोगांचे ते भोगणे । तया बाणशय्या वाटणे । ते तर पुवात लोळणे । वाटतसे तया ॥५२१॥
स्वर्गसुखाची आस । नसे तयाच्या मनास । ते तर माने तो मांस । कुत्र्याचे जसे ॥५२२॥
ऐशा वैराग्याकारणे । तया आत्मलाभ होणे । मग ब्रह्ममय होऊन रहाणे । जिवाने त्याच्या ॥५२३॥
ऐसे भौतिकात आणि स्वर्गात । जया सुख नसे वाटत । तेथेच ज्ञान असे वसत । अर्जुना माझ्या ॥५२४॥
सकाम मनुष्याप्रमाणे । तयाने कर्मही करणे । परि अहंकार तो धरणे । नसे तेथे ॥५२५॥
वर्णाश्रमधर्माप्रमाणे । तयाने नित्यकर्म करणे । काहीही चूक करणे । न घडे तेथे ॥५२६॥
परि हे मिया केले । की माझेनि सिद्धी गेले । ऐसे कधीच न म्हटले । तयाने अर्जुना ॥५२७॥
जैसे ते सहजपणे । वायूने सर्वत्र विचरणे । वा आपोआप ते उगवणे । सूर्याचे जैसे ॥५२८॥
वेद स्वभावता बोले । गंगा कारणाविण चाले । तैसे सदैव वागणे भले । तयाचे अर्जुना ॥५२९॥
ऋतु येता फळती । परि फळलो हे नेणती । ऐसी वृक्षापरी वृत्ती । तयाची सदैव ॥५३०॥
तैसे मन कर्म वाचेनं । तयाने निरहंकारी असणं । जसा दोरा घेतला काढून । माळेतून अर्जुना ॥५३१॥
संबंधेविण जैसी । अभ्रे असती आकाशी । शरीराची कर्मे तैसी । तयाची अर्जुना ॥५३२॥
दारुड्या अंगीचे वस्त्र । चित्रा हातातील शस्त्र । बैलावर जसे शास्त्र । बांधले आहे ॥५३३॥
तया पाडे देही । मी आहे हे भान नाही । निरहंकारता पाही । नाव तिचे ॥५३४॥
हे संपूर्ण जेथे दिसे । तेथेचि ज्ञान असे । यात संशय काही नसे । बिलकुल अर्जुना ॥५३५॥
जन्म मृत्यू यातना । प्रत्यक्ष प्रकटल्याविना । तो जाणे त्या सर्वांना । आधीच बा ॥५३६॥
मांत्रिकास पिशाच्याचा । योग्यास त्या अडथळ्यांचा । गवंड्यास काम बिघडण्याचा । अंदाज जसा ॥५३७॥
वैर पूर्वजन्मांचे तो । साप जसा न विसरतो । तसे गतजन्मीचे दु:ख तो । न विसरतो कधी ॥५३८॥
वाळू कण डोळ्यात न विरे । शस्त्र जखमेत न जिरे । तसे भूतकाळीचे न विसरे । तो दु:ख कधी ॥५३९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

म्हणे पुवातून प्रकटलो । मूत्रमार्गे पहा आलो । घाम मी चाटून बसलो । स्तनीचा पहा ना ॥५४०॥
उमजून ऐशियापरि । जन्माचा कंटाळा धरी । म्हणे आता ते न करी । जेणे जन्म होय ॥५४१॥
हारले जिंकाया माघारी । डाव खेळे जैसा जुगारी । वा होत असे बापाचा वैरी । पुत्र जैसा ॥५४२॥
मारता थोरल्या भावास । धाकटा तयार सूड घेण्यास । तसा नष्ट करण्या जन्मास । सज्ज हा ॥५४३॥
जन्म घेतल्याकारण । शरमिंदा त्याचे मन । स्वाभिमान्या जसा अपमान । न होई सहन ॥५४४॥
मृत्यूच पुढे आहे । हे तो जाणोनि जिये । म्हणुनी सावध होऊन राहे । आजचि तो ॥५४५॥
पुढे डोह म्हणता । मग आधीच पांडुसुता । पोहणारा आयता । सावध होई ॥५४६॥
युद्धाचा प्रसंग येता । योद्धा जशी धरतो धैर्यता । आणि शस्त्र ते न लागता । करी ढाल पुढे ॥५४७॥
भविष्यातील धोका पाहून । आजच सावध होणं । जसे औषध ते घेणं । टाळण्या मरण ॥५४८॥
जसे ते अचानकपणे । जर जळत्या घरात सापडणे । मग विहीर ते खणणे । शक्य नाही ॥५४९॥
दगड डोहात बुडाशी गेला । तैसा भवचक्रात जो बुडाला । मग तो का कधी वाचला । सांग अर्जुना ॥५५०॥
होता बलवानाशी वैर । सजग रहाणे आठ प्रहर । तसा तो आत बाहेर । सजग राही ॥५५१॥
जशी केळवली नोवरी । का संन्यासी जियापरी । तैसा न मरता तो करी । मृत्युसूचना ॥५५२॥
अर्जुना येणेप्रमाणे । जिवंतपणी  जीवभाव सरणे । आणि ब्रह्ममय होणे । ज्ञान अर्जुना ॥५५३॥
जन्म मृत्यूच्या वार्तेते । हृदयी शल्य होते । म्हणून जन्ममृत्यू ते । निवारले त्याने ॥५५४॥
असता शरीर तरुण । त्या तारुण्यात वृद्धत्व पाहून । सावध बा होऊन । राहतसे तो ॥५५५॥
म्हणे आजच्या अवसरी । पुष्टी दिसे जी शरीरी । ते होईल पहा काचरी । वाळली जैसी ॥५५६॥
भाग्य सरल्याकारण । पहा हातपाय जाती वाळून । मग करणे प्रधानावीण । राज्यकारभार ॥५५७॥
भोग घेण्याची शक्ती । निघून जाईन पहा ती । मग निरर्थक कथा ती  । शरीराची होईल ॥५५८॥
जसे त्या आषाढ महिन्यात । गुरे खुरी लागतात । तसा माझ्या शरीरात । प्रकटेल रोग ॥५५९॥
पहा त्या कमळाशी । डोळे स्पर्धा करती धाडशी । ते होतील बा जैशी । पिकली पडवळे ॥५६०॥
जाईल भुवई लोंबून । जुन्या झाड साली प्रमाणं । आणि उरही कुजेन । आसवांनी अर्जुना ॥५६१॥
जसं त्या सरड्यानं । बाभळीचे खोड घाण करणं । तसे तोंड थुंकीनं । भरेल अर्जुना ॥५६२॥
स्वयंपाकाच्या मोरीपुढे । जसे येती घाणीत बुडबुडे । भरतील तशी नाकपुडे । शेंबडानी पहा ॥५६३॥
पानाचा विडा खाऊन । दात विचकावून बोलणं । त्या तोंडाची पहा शान । जाईल लया ॥५६४॥
तोंडात बेडके येतील । दातही पडून जातील । आणि लाळ ती गळेल । तोंडातून अर्जुना ॥५६५॥
कर्जात त्या अडकता । न होते कधी मुक्तता । जसे नाठाळ ढोर बसता । उठेच ना ॥५६६॥
प्रकटता वाऱ्याची गती । कुसळे हवेत उडून जाती । तशा दातदाढा उमळती । आपोआप ॥५६७॥
आषाढाच्या महिन्यात । डोंगर जसे पाझरतात । तसे लाळांचे लोट गळतात । तोंडातून पहा ॥५६८॥
तोंडा बोलता न येईल । कान ऐकणे सोडतील । शरीर होईल बेडौल । माकडापरी ॥५६९॥
गवताचे ते बुजगावणे । त्याने वाऱ्याबरोबर हालणे । तैसे सर्वांगाचे थरथरणे । होईल तेव्हा ॥५७०॥
पाय वाकडे होतील । हात वळून जातील । असे सोंग ते होईल । शरीर अर्जुना ॥५७१॥
मलमूत्रांची द्वारं । सतत ती गळणार । आणि मृत्यूचा नवस करणार । आप्त सारे ॥५७२॥
देखोनी जग थुंकेल । मृत्यूचा पाश पडेल । उबग सर्वांना येईल । तेव्हा अर्जुना ॥५७३॥


For Complete Dnyaneshwari Visit :  www.esahity.com

मला सर्व पिशाच्च म्हणतील । बालके ती घाबरतील । सर्वांना किळस वाटेल । माझी अर्जुना ॥५७४॥
खोकल्याची उबळ येईल । त्रास शेजाऱ्यांना होईल । किती त्रास म्हातारा देईल । म्हणतील सारे ॥५७५॥
ऐशा वार्धक्याच्या खुणा । तरुणपणीच पाही त्यांना । मग विटून जाणे जीवना । घडे तेथे ॥५७६॥
म्हणे वार्धक्य पहा येईल । हे तरुणपण बा जाईल । अहितच ते होईल । आता माझे ॥५७७॥
म्हणून जाण्याआधी कान । तो करी शास्त्र श्रवण । आणि करीतसे तीर्थाटन । धडधाकटपणी ॥५७८॥
येण्याआधी आंधळेपण । पहायचे ते घ्यावे पाहून । सुभाषितांचे करावे उच्चारण । धडेपणी ॥५७९॥
पुढे हात निकामी होणं । म्हणून आधीच करतसे दान । अशी भविष्याची जाण । असे त्याला ॥५८०॥
ऐसी दुर्दशा होऊन । वेडे होईल ते मन । म्हणून आत्मज्ञानाचे चिंतन । आजचि करी ॥५८१॥
चोर संपत्ती नेतील चोरून । म्हणून दानधर्म करणं । आणि झाकाझाक करणं । विझण्यापूर्वी दिवा ॥५८२॥
तैसे वार्धक्य येऊन । सर्व व्यर्थ होईन । ऐसा विचार करून । सावध होई ॥५८३॥
चालता सायंकाळ होणं । वाटेवर जुना किल्ला लागणं । मग तया उपेक्षून जाणं । अकल्याण की ॥५८४॥
तैसा वृद्धापकाळ येऊन । सर्व वायाच जाईन । मग शतायुषीही होणं । व्यर्थ आहे ॥५८५॥
एकदा तिळाचे झाड झोडले । आणि सर्व तीळ काढले । मग पुन्हा जरी ते झोडपले । उपयोग नाही ॥५८६॥
म्हणून येण्याआधी म्हातारपण । तयाने ब्रह्ममय होणं । तेच आहे ज्ञान । अर्जुना माझ्या ॥५८७॥
धडधाकट जोवर शरीर । तेव्हाच करून तयाचा वापर । तो होतसे पार । भवचक्राच्या ॥५८८॥
मृत्यूच्या तडाख्यातून । तो जात असे निघून । ब्रह्ममयता अनुभवून । अंतरी अर्जुना ॥५८९॥
दु:ख जयाचे कारणे । आणि शोकाचे उपजणे । ते सोडून सावधपणे । मुक्त होई ॥५९०॥
ज्या ज्या कर्माकारण । दोषांचं होई प्रकटन । ते ते सर्व सोडून । देतसे तो ॥५९१॥
मनोभूमिका ऐसी । असते जयाच्या मानसी । तयाची एकी ज्ञानासी । झाली अर्जुना ॥५९२॥
आता आणिकही एक । लक्षण ते अलौकिक । सांगेन मी ऐक । अर्जुना आता ॥५९३॥
वाटसरू जसा धर्मशाळेत । आसक्ती नाही धरत । तैसा तो देहात । आसक्त नाही ॥५९४॥
जशी झाडाची सावली । रस्त्याने जाता लागली । तिच्याशी का आसक्ती ठेवली । कोणी अर्जुना ॥५९५॥
जसं शरीराच्या सावलीनं । आपल्या सोबत असणं । त्या सावलीशी का आसक्त होणं । घडे कधी ॥५९६॥
मुलेबाळे जी झाली । आपुल्या पोटी जन्मली । तयांशीही कधी न वाटली । आसक्ती तया ॥५९७॥
कुटुंबातही राहून । घडे तयाचं जगणं । पण अंतरीच अलिप्तपण । जागे सदैव ॥५९८॥
जसा तो पिंजऱ्यात । पोपट असे बंदिस्त । तसा तो शुद्ध वर्तनात । राही सदा ॥५९९॥
ऐसी दारागृहपुत्री । नाही जया मैत्री । तो जाण पां धात्री । ज्ञानासी गा ॥६००॥
जसे त्या समुद्राने । उन्हाळा पावसाळा न भेद करणे । तैसे इष्ट अनिष्ट मानणे । सम याने ॥६०१॥
जसे सूर्याच्या ठिकाणी । नसे अंधाराची कहाणी । तैसे भेदाभेद तया मनी । नसती कधी ॥६०२॥
ऐसे नभाच्या प्रमाणे । समत्व मनी असणे । तेथे ज्ञानाचे नांदणे । ओळख तू ॥६०३॥
आणि मीवाचूनी काही । विश्व अन्य नाही । ऐसी अनुभूती तीही । अंतरी त्याच्या ॥६०४॥
शरीर वाचा मनानं । तयाने विश्वी एक होणं । तया एक मी वाचून । न दिसे काही ॥६०५॥
ऐसे तयाचे अंत:करण । मजसी एकरूप होणं । मग आम्ही दोघे जण । भिन्न नाही ॥६०६॥
करणे पतीशी मीलन । पतिव्रते अवघड न वाटणं । तैसे मजसी एकरूप होणं । तयाने अर्जुना ॥६०७॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

## ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्‌गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे ह्रदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०